Vol. 7, Issue 4, January 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**

**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera

**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास

सौ. ज्योति सुभाष महाजन
पी.एच.डी.विद्यार्थी( शिक्षणशास्त्र) , टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.



## प्रस्तावना

शाळा म्हणजे एक छोटेखानी समाज होय. वयाच्या सहाव्या वर्षी मूल प्राथमिक शाळेत जाऊ लागते. हल्ली काही मुले माँटेसरी, नर्सरी, अंगणवाडी, बालवाडी इतकेच काय तर प्ले ग्रुप सारख्या शाळांमधूनही जातात. घराच्या वातावरणातून शाळेत आलेली मुले सुरुवातीला भांबावलेल्या स्थितीत असतात. हळूहळू सरावाने ते शालेय जीवनाशी समायोजन साधू लागतात.

प्रत्येक मल हे शिकत शिकत घडत असते. 'समायोजन करण्यासाठी योग्य तो बदल करण्याची प्रक्रिया म्हणजेच अध्ययन'. बेनॉर्ड यांच्या मते, 'परिस्थितीशी समायोजन करण्याच्या पध्दतीत सुधारणा व्हावी यासाठी कृती व अनुभव यांद्वारे वर्तनात अपेक्षित बदल करणे म्हणजे अध्ययन' होय. विद्यार्थी हा अध्ययन करणारा व शिक्षक अध्यापन करणारा असतो. अलिकडची शिक्षण पध्दती विद्यार्थी केंद्रित असल्याने शिक्षकाने विद्यार्थ्यास विचारणे, समजून घेणे इत्यादी बाबी आवश्यक असतात. विद्यार्थ्यांचे वर्तन शैक्षणिक मानसशास्त्रामुळे जाणून घेता येते.

## संशोधनाचे महत्त्व

घरात, शाळेत, समाजात वावरतांना हल्ली मुलांमध्ये वर्तनविषयक समस्या जाणवतात. सहनशीलता नसणे, उध्दटपणा, गैरवर्तन, छंद जोपासण्यातील अडचणी यांसारख्या अनेक वर्तन समस्या जाणवतात. संकटावर मात करणे, आलेल्या परिस्थितीला सामोरे जाणे, नकार पचविणे इत्यादी क्षमता मुलांमध्ये कमी होत असल्याचे जाणवते. त्याचा दुष्परिणाम मुलांच्या विविध क्षेत्रातील विकासावर होतो. यांतून ताण तणाव निर्माण होतो व कुटुंबील स्वास्थ्य बिघडते. यांमागील कारणमीमांसा शोधण्यासाठी कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करावासा वाटला.

## समायोजन क्षमता

**संकल्पनात्मक व्याख्या** 'Adjustment is the process by which a living organism maintains a balance between its needs and the circumstances that influence the satisfaction of these needs' शाफर एल.एफ.

स्वतःच्या गरजा व या गरजांचे समाधान करणारी परिस्थिती यांमध्ये संतुलन राखण्यासाठी जीवित व्यक्ती जी प्रक्रिया करते, ती प्रक्रिया म्हणजे समायोजन होय.

**कार्यात्मक व्याख्या** एच.एम्.बेल यांच्या समायोजन शोधिकेनुसार कौटुंबिक, आरोग्यविषयक, सामाजिक व भावनिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता म्हणजे समायोजन क्षमता.

**नमुना निवड** पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाणच्या मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानीत बारा माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववीचे ९८५ विद्यार्थी प्रासंगिक पध्दतीने निवडले. त्यांपैकी ४५९ मुले व ५२६ मुली आहेत.

## समायोजन शोधिकेचे विश्लेषण

विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचे मापन करण्यासाठी प्रमाणकांचा वापर केला. समायोजन कसे आहे, ते ठरविण्यासाठी उत्कृष्ट, चांगले, समाधानकारक/सर्वसाधारण, असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक अशा पाच गटांमध्ये विद्यार्थ्यांचे वर्गीकरण केले. कौटुंबिक, आरोग्यविषयक,

सामाजिक व भावनिक अशा चारही क्षेत्रांच्या एकूण प्राप्तांकांवरुन विद्यार्थ्यांची सर्वसाधारण एकूण समायोजन क्षमता पुढीलप्रमाणे ठरवता येते.

| प्राप्तांक गट | समायोजन क्षमता वर्णन |
|---|---|
| ० ते १२ | उत्कृष्ट |
| १३ ते २४ | चांगली |
| २५ ते ४४ | सर्वसाधारण |
| ४५ ते ६० | असमाधानकारक |
| ६१ व पुढे | अत्यंत असमाधानकारक |

*सारणी १ एकूण प्राप्तांकावरुन सर्वसाधारण समायोजन क्षमता वर्णन.*

सारणी १ वरुन स्पष्ट होते की, अधिक प्राप्तांक हे कमी समायोजन क्षमता दर्शवितात आणि कमी प्राप्तांक हे अधिक समायोजन क्षमता दर्शवितात. मुले, मुली व एकूण (मुले + मुली) विद्यार्थ्यांची प्रत्येक गटातील शेकडेवारी पुढील सारणीत दिली आहे.

| | समायोजन क्षमता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्कृष्ट % | चांगली % | सर्वसाधारण % | असमाधान कारक % | अत्यंत असमाधानकारक % | एकूण % |
| मुले | ००.८७ | १०.६८ | ४५.५३ | २८.३२ | १४.६० | १०० |
| मुली | ००.३८ | ०७.२२ | ३३.०८ | ३१.५६ | २७.७६ | १०० |
| एकूण | ००.६१ | ०८.८३ | ३८.८८ | ३०.०५ | २१.६२ | १०० |

*सारणी २ विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचे शेकडा प्रमाण*

सारणी २ वरुन असे लक्षात येते की ००.८७% मुलांची आणि ००.३८% मुलींची समायोजन क्षमता उत्कृष्ट आहे. म्हणजेच मुलांची समायोजन क्षमता ही मुलींच्या समायोजन क्षमतेपेक्षा अधिक उत्कृष्ट आहे. एकूण इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांपैकी केवळ ००.६१% विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता उत्कृष्ट आहे. समायोजन क्षमता चांगली व सर्वसाधारण असण्याचे प्रमाण मुलांचेच अधिक आहे आणि असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक समायोजन क्षमता असण्याचे प्रमाण मुलांचे मुलींपेक्षा कमी आहे. निष्कर्ष यावरुन हे सिध्द होते की, एकूणच मुलांची समायोजन क्षमता मुलींच्या समायोजन क्षमतेपेक्षा अधिक चांगली आहे.

## समारोप

मानसशास्त्राचा प्राथमिक अभ्यास केलेली व्यक्ती देखील हे जाणते की कौटुंबिक व भावनिक ही समायोजनाची मुलभूत क्षेत्रे आहेत. तिथे निर्माण होणाऱ्या समस्यांचे परिणाम पुढे इतर क्षेत्रांवर होतात. म्हणुनच विद्यार्थी व त्यांच्या पालकांनाही समुपदेशनाची नितांत गरज भासू लागली आहे. त्याच्या अभावी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व शेवटी आरोग्यविषयक समस्याही झपाट्याने वाढू शकतात. म्हणनूच कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या अनेक समस्यांच्या मुळाशी जाऊन त्यावर योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## संदर्भ

१) अभ्यंकर, शोभना व देसाई, भरत (२०१०) : प्रायोगिक मानसशास्त्र आणि संशोधन पध्दती, पुणे नरेंद्र प्रकाशन.
२) दुनाखे, अरविंद (१९९८) : शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे, नूतन प्रकाशन
३) वैद्य, पु.ग. व वाळिंबे गिरीश (१९९७) : उज्ज्वल भवितव्यासाठी शैक्षणिक व व्यवसाय मार्गदर्शन, पुणे, नितीन प्रकाशन.



सौ. ज्योति सुभाष महाजन
पी.एच.डी. विद्यार्थी (शिक्षणशास्त्र) , टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.